देवणी गोवंश

डांगी, गीर आणि स्थानिक देशी गोवंशाच्या संकरातून मराठवाडा विभागा मध्ये देवणी गोवंश तयार झाला. दुग्धोत्पादन व शेती कामा मध्ये समान उपयुक्तता आणि दुष्काळग्रस्त परिस्थिती मध्ये कोरडा निकृष्ट चारा खाऊन ऊन वारा, पाऊस आणि थंडी सहन करणारा हा गोवंश आहे.

अत्यंत देखणा, विविधस्तरां वरील प्रदर्शनांत मानांकन सिद्ध करणारा दुहेरी गोवंश म्हणजे देवणी. दुग्धोत्पादन व शेती कामा मध्ये समान उपयुक्तता आणि दुष्काळग्रस्त परिस्थिती मध्ये कोरडा निकृष्ट चारा खाऊन ऊन वारा, पाऊस आणि थंडी सहन करणारा हा गोवंश आहे.

सतराव्या शतका पासून गीर जातीच्या जनावरां चे कळप गुजरात मधून मराठवाड्यात चाऱ्याच्या शोधात येत असत. तत्कालीन पशुपालक त्या काळात गीर आणि स्थानिक जनावरां चे संकर घडवून आणत असत. त्यातून जन्मलेली वासरे आकर्षक बाह्य गुणांची असल्यामुळे शेतकऱ्यांना या बद्दल आवड निर्माण झाली. त्यातूनच देवणी गोवंशा ची निर्मिती झाली. त्या काळात या गोवंशा ला सुरती, डोंगरी असेही म्हटले जायचे.

देवणी गोवंशा चा अधिवास : डांगी, गीर आणि स्थानिक देशी गोवंशा च्या संकरातून देवणी गोवंश तयार झाला. देवणी जाती चा अधिवास बालाघाटच्या पर्वत रांगा म्हणजेच छ. संभाजी नगर जिल्ह्याच्या कन्नड तालुक्या पासून नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्या पर्यंत आहे. याभागातील बालाघाटच्या पठारा वरील मुख्य मांजरा नदी व उपनद्या यांच्या खोऱ्या मध्ये हा गोवंश आढळतो.

देवणी गोवंशा चे मूळउगमस्थान लातूर जिल्ह्यातील देवणी तालुका आहे. या जाती ची जनावरे संपूर्ण लातूर जिल्हा, नांदेड जिल्ह्यातील देगलूर, मुखेड, लोहा आणि कंधार तालुक्यात, परभणी जिल्हा, धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर आणि उमरगा तालुक्यात आढळतात. तसेच कर्नाटक राज्यातील बिदर, भालकी या भागांत आढळतात.

आकारमाना ची वैशिष्ट्ये :

गाय : मध्यम आकार व आपोटशीर बांधा. मूळ रंग पांढरा आणि त्या वर काळ्या रंगाचे अनियमित आकारा चे ठिपके असतात. कातडी ला देखणी चमक असते. त्वचा अत्यंत मऊ असते. कातडी शरीरा ला घट्ट चिकटलेली असते. कपाळा ची ठेवण भरदार असते. शिंगे मागा हून बाहेरच्या बाजूस येणारी बाकदार व दंडगोला कृती असतात. शिंगां चा रंग काळा असतो. डोळे लांबट व अंडा कृती असतात. पापण्या संपूर्णपणे काळ्या असतात. कान मध्यभागी पसरट, टोकाला गोलाकार व मागे पडलेले असतात. नाकपुडी काळी पसरट व मध्यभागी फुगीर असते. वशिंड पिळदार घट्ट, परंतु शरीरा च्या एका बाजूस थोडे झुकलेले असते. माने खालची पोळी शरीराला शोभेल अशी असते. मान लांब व रुंद असते. मागचे पाय शरीराच्या माना ने

किंचित उंच असतात, मांड्या पुष्टदार असतात. पाठ मागच्या बाजूने वशिंडा कडे किंचित उतरती असते. त्यामुळे त्यांना शोभा येते. त्वचा मध्यम जाड, हालचाल होणारी असल्या मुळे माश्या, डास व इतर कीटकांपासू त्यांचे संरक्षण होते.

बैल : नजरेत जरब असते, कायम रोखून बघण्याची सवय असते. जड शेती काम आणि ओढकामा साठी मजबूत भक्कम पायां चे सांधे या गुणांमुळे बैल लोकप्रिय आहेत. बैल शेती कामासाठी काटक असतात. जास्त तापमान सहन करू शकतात.



बैल वयाच्या २४ ते ३० महिन्यां पासून कामाला जुंपतात. बैल त्याच्या वयाच्या १२ वर्षां पर्यंत चांगले कार्यक्षम असतात. शुद्ध देवणी बैला चे सरासरी वजन ५०० किलो ग्रॅम असते.

उत्पादन क्षमता: गाई मध्ये धष्टपुष्ट विकसित मोठी कास, काळ्या रंगा चे सारख्या अंतरा वर चार सड असतात. सरासरी पहिल्या माजा चे वय ३० ते ३५ महिने आहे. पहिल्या विण्या चे सरासरी वय ४० ते ४६ महिने असते. शुद्ध गाय एका वेतात सरासरी ६०० ते ८०० लिटर दूध देते. म्हणजेच एका दिवसाला दोन ते तीन लिटर दूध उत्पादन मिळते. दुधा मध्ये फॅटचे प्रमाण सरासरी ४.५ टक्के असते. आयुष्यात सरासरी आठ ते दहा वासरे देते. गायी चे सरासरी वजन ४२० किलो आहे. दूध, दही, ताक, तूप व इतर दुग्धजन्य पदार्थांना मोठी मागणी आहे.


शारीरिक गुणधर्म : देवणी जात गुजरात मधील गीर, खानदेशातील डांगी आणि स्थानिक देशी गोवंशा च्या संकरातून विकसित झालेली आहे. म्हणून या गोवंशा चे शरीर गीर सारखे, रंग डांगी जातीशी मिळता जुळता दिसतो. देवणी गोवंशा मध्ये तीन प्रकारच्या उपजाती आहेत. हे तीन रंगांच्या फरकांमध्ये आढळते. शरीर मध्यम, विकसित डोके रुंद आणि किंचित बहिर्वक्र आहे. वानेरा आणि शेवरा मध्ये डोक्याचा रंगकाळा आणि पांढरा आणि बाळंक्या जाती मध्ये पूर्णपणे पांढरा असतो.

वानेरा : चेहऱ्याचा काही भाग काळ्या रंगाचा आणि संपूर्ण शरीर पांढऱ्या रंगाचे असते. यांची संख्या एकूण देवणी च्या संख्ये मध्ये ४४ टक्के आहे.





बाळंक्या : शरीराच्या खालच्या बाजूला काळे डाग असलेला, स्वच्छ पांढरा शुभ्र रंग असतो. यांची संख्या एकूण संख्येच्या १० टक्के आहे.



शेवरा : अनियमित काळे डाग असलेले पांढरे शरीर, काळ्या-पांढरा (काळा बांडा) रंगा चा हा गोवंश आहे. यांची संख्या एकूण संख्येच्या ४६ टक्के आहे.